दैनिक लोकपरिवर्तन
निर्भिड निष्पक्ष आवाज जनतेचा
संपादक - आबासाहेब शिरसाठ
सोमवार दिनांक१६जुन२०२५ उपसंपादक पोपटराव सोनवणे कार्यकारी संपादक भारत भालेराव

# क्विक हिल फाउंडेशनच्या "सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा" या अभियानासाठी बी.जे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर म्हणून निवड .



**दै.लोकपरिवर्तन**

आळे(प्रतिनिधी )महाविद्यालयात बीसीए व बीएस्सी(संगणक शास्त्र) विभागातील चार विद्यार्थ्यांची क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात आलेल्या "सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा" या अभियानासाठी क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. क्लब ऑफिसर म्हणून निवडल्या गेलेल्या विद्यार्थ्यांमध्ये साक्षी नेहेरकर(प्रसिडेंट),मोहिनी जगताप (सेक्रेटरी),ऋतू नेहरकर(ॲक्टिव्हिटी डायरेक्टर), शोएब शेख(पी.आर.मेडिया डायरेक्टर)आदि विद्यार्थ्यांचा समावेश आहे.सदर विद्यार्थ्यांचे ट्रेनिंग व ओरिएंटेशन विमान नगर(पुणे) येथील क्विक हिल कंपनीच्या ऑफिसमध्ये घेण्यात आले, या ट्रेनिंग सेशन दरम्यान विद्यार्थ्यांना अजय शिर्के सर,गायत्री केसकर-पवार मॅडम यांनी मार्गदर्शन केले.क्वीक हिलच्या चेअर पर्सन अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना पुढिल वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.निवड झालेले विद्यार्थी पुढील काही दिवसांसाठी क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पासाठी सायबर सिक्युरिटी अवेअरनेस बद्दल विद्यार्थ्यांना व सामाजिक घटकांना मार्गदर्शन करून त्यांच्यात जागरूकता निर्माण करण्याचे काम करणार आहेत. तसेच विभागप्रमुख प्रा नूतन जोशी यांची या अभियानासाठी शिक्षक समन्वयक म्हणून निवड करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रवीण जाधव यांनी या प्रकल्पाबद्दल सांगताना निवड झालेले विद्यार्थी हे आपल्या शैक्षणिक संकुलाच्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्याचे काम करणार आहेत, तसेच हे अभियान सक्षमपणे राबविण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अजयनाना कुऱ्हाडे ,बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे तसेच संचालक किशोर कु-हाडे,भाउ कु-हाडे, बबन सहाणे , उल्हास सहाणे, बाबु कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ , जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके , प्रदिप गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे व सर्व संचालक मंडळ यांनी शुभेच्छा दिल्या.